# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

## मंडई कार्यालय

---

## ऑफलाईन लिलाव प्रक्रिया जाहिर प्रसिध्दीकरण

सोलापूर शहर येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या महात्मा फुले मंडई ,राणी लक्ष्मीबाई मंडई व कस्तुरबा मंडई मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ या चे कलम ७९ अन्वये व मालमत्ता हस्तांतर नियमास अधिन राहून गाळे निश्चती तारखेपासून ११ महिने करिता गाळे भाड्याने देण्याकामी ऑफलाईन लिलाव प्रक्रिया पध्दतीने करण्याकामी सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर दि.१०/०२/२०२४पासून पाहणेस उपलब्ध आहेत.

**कामाचे नाव** :- शहर सोलापूर येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या महात्मा फुले मंडई व राणी लक्ष्मीबाई मंडई व कस्तुरबा मंडई मधील गाळे ऑफलाईन लिलाव प्रक्रिया जाहिर प्रसिध्दीकरण करणे बाबत.

| अ.क्र. | मार्केटचे नाव | गाळा क्र. | गाळयांचे क्षेत्रफळ | रेडीरेकनर नुसार दरमहा प्रती गाळा भाडे र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | महात्मा फुले मंडई | तळमजला क - १४ | ७.७३ | १९९२. |
| २ | महात्मा फुले मंडई | तळमजला क - २० | ६.९३ | १७८६ |
| ३ | महात्मा फुले मंडई | पहिल मजला क - १२ | १४.२५ | २४२७ |
| ४ | महात्मा फुले मंडई | पहिल मजला क - ०१ | १४.२५ | २४२७ |
| ५ | महात्मा फुले मंडई | पहिल मजला ड - १० | १४.७४ | २५१० |
| ६ | महात्मा फुले मंडई | तळघर | ३५६ | ९१७५१ |
| ७ | राणी लक्ष्मीबाई मंडई | २९ ते ४४ | १३.०२ | ४६६७ |
| ८ | राणी लक्ष्मीबाई मंडई | ६३ ते ७२,७८ ते ८९ | १३.०५ | ४६७८ |
| ९ | कस्तुरबा मंडई | गाळा क्र.५१ | ८.०९ | १८०६ |

सदरचे ऑफ लाईन लिलाव प्रक्रिया दि.१२/०२/२०२४ ते दि.१४/०२/२०२४ रोजी सकाळी १०.०० ते ०६.०० वाजेपर्यंत घेण्यात येईल. सदर ऑफ लाईन लिलाव प्रक्रियेसाठी लागणाऱ्या कागदपत्रांची छाननी लिलावा दिवाशी सकाळी १०.०० ते ११.०० वाजेपर्यंत करण्यात येईल.

टिप :- गाळे लिलावामध्ये भाग घेण्यासाठी प्रवेश शुल्क रक्कम रु .२०००/- इतकी राहिल

अतिरिक्त आयुक्त

सोलापूर महानगरपालिका सोलापूर

# शर्ती व अटी

१. सदर गाळे ज्या कारणासाठी घेतलेला आहे. त्याच कारणासाठी वापर करावयाचा आहे.

२. सदरच्या जागाची मुदत ११ महिन्या करीता असेल.

३. मार्केट मधील गाळ्यांची वेळ सकाळी ७ ते रात्री १० पर्यंत असेल. त्यांना निर्देशित केलेल्या वेळेमध्ये व्यवसाय करायचा आहे.

४. सदर जागेचा परिसरातील स्वच्छता ठेवणे ही संबधीत गाळे धारकांचे काम आहे.

५. ओला व सुका कचरा वर्गीकरण करणे याची जबाबदारी गाळे धारकांची असेल.

६.जागेच्या परिसरातील कचरा घंटागाडी मध्ये टाकणे याची जबाबदारी गाळे धारकांची असेल.

७.सदर जागा वापरत असलेल्या मालाची जबाबदारी संबधीत गाळे धारकाची असेल.

८.सदर ओट्यांचे ठरलेले दर महाभाडे दरमहा १० तारखेच्या आत भरावयाचे आहे. त्या बाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

९. गाळेचे भाडे मुदतीत न भरल्यास दरमहा २ % इतके व्याजासह आकारणी करण्यात येईल.

१०. गाळेबाबत वाद निर्माण झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधिल मालमत्ता संपादन करण्याचा संबधीताच्या महानगरपालिकेचा अधिकार याबाबतचे संबंधीत तरतुदी व तद्अनुषंगीक तरतुदीस अनुसरून योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त सोलापूर महानगरपालिका सोलापूर यांना आहेत.

११. सदर गाळे महापालिकेस सार्वजनिक हिताच्या दृष्टीने जेव्हा कोणत्याही कारणास्तव जरुरी पडेल तेव्हा सदरची जागा गाळे धारकांस नोटीस दिल्यापासून १ महिण्याच्या आत विना तक्रार महापालिकेस कूठल्याही प्रकारची तोषिस अथवा खर्च होवू न देता रिकामे करून देण्याचे आहे. त्याबाबत गाळेधारकांस कोणतेही नुकसान भरपाई मागणेचा अधिकार राहणार नाही. जर म.न.पा.स अशा प्रसंगी गाळ्याची जागा ताब्यात घेणेकामी नाईलाजाने खर्च करावा लागल्यास तो खर्च गाळे धारकाकडून वसूल करण्याचा अधिकार म.न.पा.स आहे.

१२. सदर गाळेवर लागणारी इले कनेक्शन मीटर इले फिटिंग पंखे टयुब वगैर, साहित्य गाळे धारकांने स्वखर्चान लायसन्सड इलेक्ट्रिशियन यांचेकडून करून घ्यावयाचे आहे. दरमहाचे इलेक्ट्रीक बील परस्पर महाराष्ट्र वीज मंडळाकडे गाळेधारकाने भरावयाचे बंधनकारक आहे.

१३. सदर गाळ्याची जागा पोट-भाड्यानी देता येणार नाही, अथवा अन्य प्रकारे हस्तांतर गहाण दान, बक्षीस गुडविल अथवा कोणत्याही प्रकारे त्रयस्थ पक्षाचे हितसंबंध त्यावर प्रस्थापित करता येणार नाही व अन्य रितीने परस्पर महापालिकेच्या परवानगी शिवाय तबदील करता येणार नाही, ही सदर भाडेकरारपत्राची एक अविभाज्य व महत्वपूर्ण अट गाळेधारकांना मान्य असेल. अन्यथा या अटीपैकी कोणतीही शर्ती व अटीचे भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर जागेवरचा असलेला हक्क रद्द केला जाईल व सदर जागा ताब्यात घेण्यात येईल. तसेच भरलेली डिपॉझिट रक्कम म.न.पा.कडून जप्त करण्यात येईल त्याबदल गाळे धारकांची कोणतीही तक्रार करणार नाही.

१४. महापालिकेने नेमलेले अधिकार व सेवकवर्ग यांना केव्हाही जागा पाहण्याचा व तपासणी करण्याचा अधिकार राहील व त्यांनी केलेल्या सूचनाचे पालन गाळे धारकाने करणे अनिवार्य आहे.

१५. सदर जागावर कोणत्याही नैसर्गिक अथवा अनैसर्गिक कारणाने आग व इतर कोणत्याही कारणाने नुकसान झाल्यास किंवा केल्यास ती नुकसान भरपाई भरून देण्याची जबाबदारी

१६. आजूबाजूच्या इतर गाळे धारकांस उपद्रव्य होईल व आजूबाजूस जवळपास सार्वजनिक आरोग्यच्या दृष्टीने घाण / अनारोग्यदायी परिस्थिती निर्माण होईल असे वर्तन गाळे धारकाने करता कामा नये. तशी गाळे धारकांनी काळजी घेतली पाहिजे.

१७. सदर गाळे धारकांची मुदत संपताच सदरची जागा महापालिकेच्या ताब्यात सुस्थितीत पणे दिला पाहिजे.

१८. सदरची गाळेची जागा म.न.पा.कडून भाड्याने घेतल्या नंतर म.न.पा.स पूर्व कल्पना न देता परस्पर अन्य व्यक्तीस अथवा संस्थेस विक्री करणे अथवा भाड्याने देण्याचा व्यवहार करणार नाही, असे गाळे धारकांवर बंधणकारक असेल, भाड्याने / विक्री केल्याचे पुरावे उपलब्ध झाल्यास अथवा तक्रार येईल ते सिध्द झाल्यास फसवणूकीच्या गुन्ह्यास पात्र राहिल.

१९. सदर गाळे धारकास ३ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून भरावे लागतील. सदर अनामत रक्कम लिलावाच्या दिवशी भरून ती जागा निश्चित करावी लागेल.

२०. लिलावामध्ये भाग घेण्यासाठी आधार कार्ड, PAN कार्ड, शॉप एकट् लायसन्स यांच्या तीन स्व साक्षांकित प्रती, तीन फोटो या कागदपत्रांची छाननी करावी लागेल.

२१. गाळे फक्त भाजी व्यवसायासाठी आहे. इतर कोणताही व्यवसाय तेथे करता येणार नाही. सदर गाळे मध्ये अर्जदार आणि त्याचे नजीकचे कुटुंबीय यांना व्यवसाय करता येईल.

२२. विक्रीचा माल फक्त देण्यात आलेल्या ओट्यामध्ये ठेवणे बंधनकारक असून इतर मोकळी जागा त्यासाठी वापरता येणार नाही.

२३. सदर गाळे मध्ये स्फोटके अथवा ज्वालाग्राही पदार्थ ठेवता येणार नाहीत.

२४. सदर गाळे चा विक्रेता किंवा नोकर हा संसर्गजन्य रोगांपासून मुक्त असला पाहिजे.

२५. उपयोगात आणावयाची मापे आणि काटे हि सक्षम अधिकार्याकडून प्रमाणित केलेली हवीत.

२६. सदर गाळेची दुरुस्ती आणि निगा मंजूर ओटेधारकाने स्वखर्चाने करणे बंधनकारक आहे.

२७.सदर ओट्यामध्ये कोणताही फेरबदल करवयाचा नाही.

सदरच्या गाळयामध्ये कोणताही निषीध्द व्यवसाय गाळेधारकास करता येणार नाही.

२८.विक्रिस ठेवलेल्या मालाचा निरुपयोगी भाग अगर कोणत्याही प्रकारची घाण मंडईमध्ये ठरविलेल्या जागीच टाकली पाहिजे.

२९.वेळोवेळी गाळेधारकांची अगर त्यांच्या सेवकांची शारीरीक तपासणी व विक्री करीता ठेवलेल्या मालाची तपासणी महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी अगर महानगरपालिकेने पाठविलेल्या अन्य अधिकारी यांना करण्याचा अधिकार आहे.

३०.कोणत्याही गाळेधारकाला गिऱ्हाईकांच्या आकर्षणाकरीता कर्णकर्कश ध्वनीचा व त्यासंबंधित साहित्याचा उपयोग करता येणार नाही.

अतिरिक्त आयुक्त

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर